# अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा ब्राम्हणी कांगावा

— रेखा ठाकूर, मुंबई

**वृत्तरत्न सम्राट १३ व १४ जून, २००८.**

५ जून रोजी शिवसंग्राम संघटनेच्या कार्यकर्त्यांनी दै. 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांच्या घरावर हल्ला केल्याप्रकरणी सर्व थरातून या गुंडगिरीचा निषेध होत आहे व असहिष्णुता वाढत असल्याबद्दल चिंता व्यक्त होत आहे. पत्रकारीतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याबद्दल ही चिंता व्यक्त होत आहे.

हिंसा, गुंडगिरी आणि असहिष्णुता निषेधार्हच आहे आणि बहुजन चळवळीने तर त्याचा कधीह अवलंब करता कामा नये. परंतु गुंडगिरी दुर्बल, कमकुवत, असुरक्षित व एकाकी व्यक्तीच्या व समुहाच्या विरोधात किंवा शक्तीमान शत्रूच्या विरोधात लढणाऱ्यांचा आवाज बंद करण्याच्या इराद्याने, ताकदीने होते, तेव्हा आणि वर उल्लेखिलेल्या या विशिष्ट घटनेत खूपच फरक आहे. वृत्तवाहिन्या आणि वर्तमानपत्रे हे आज आपल्या देशात प्रचंड ताकदवान, एखाद्या सत्ताधाऱ्यापेक्षाही ताकदवान, शक्तीकेंद्रे बनली आहेत आणि कुमार केतकरांवरील हल्लेखोरांची आज जी पळापळ झाली आहे, ती या विषम सत्तासमीकरणाचाच पुरावा आहे.

वृत्तपत्रांना लोकशाहीचा आधारस्तंभ मानले जाते. परंतु भांडवलदारांच्या पैशावर निर्माण झालेल्या व या देशाच्या उच्चवर्णीय अभिजनांच्या वर्चस्वाखालील मीडिया हा लोकशाहीचा नव्हे तर या देशातील प्रस्थापित व्यवस्थेचा आधारस्तंभ आहे. गेल्याच वर्षी प्रसिद्ध समाजसंशोधक प्रा. योग्रेंद्र यादव यांनी केलेल्या पहाणीमध्ये भारतातील एकूण एक प्रसारमाध्यमांच्या निर्णय व्यवस्थापनामध्ये ओबीसी, दलित, आदिवासी जवळजवळ अजिबात नाहीत, असे दिसून आले, हा याचा सज्जड पुरावा आहे. म्हणूनच स्वत:चे विचार आणि कार्य यांच्या प्रसारासाठी बहजनांना स्वत:ची नियतकालिके निर्माण करावी लागतात व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अपुऱ्या साधनसामुग्रीवर चालवावी लागतात.

अजूनही ब्राम्हणी वर्चस्वाखाली असलेली आपल्या देशाची प्रशासकीय सत्ता आणि लोकसभा, विधानसभा सरकारे यामधील राजकीय सत्ता या औपचारिक सत्तास्थानाच्या पलिकडे प्रस्थापित सत्ताधारी वर्गाला बळ पुरविणारी सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक अधिसत्ता काम करीत असते. ही सत्ता या देशातील ब्राम्हणी अभिजनवर्गाच्या ताब्यात आहे आणि इथला मीडिया किंवा प्रसिद्धीमाध्यमे हा या अधिसत्तेचा भाग आहे. ही प्रसिद्धीमाध्यमे व वर्तमानपत्रांच्या 'विचार स्वातंत्र्यांचा' गळा आवळण्याची ताकद इथल्या शिवसंग्राम संघटनेच्या कार्यकर्त्यांतही नाही आणि इथल्या राजकीय सत्ताधाऱ्यातही नाही. त्यामुळेच 'नसलेल्या' विरुद्धची चाललेली उरबडवेगिरी हा प्रस्थापितांच्या प्रचारयंत्रणेचाच भाग आहे.

अन्याय, जुलुमी सत्तेविरुद्ध किंवा ताकदवान शक्तीविरोधात लढणारी पत्रकारिता जेव्हा निधडेपणाने न्यायाची भूमिका घेते तेव्हा ती स्वत:च्या विचार स्वातंत्र्यासाठी नि:स्पृहपणे काही धोके पत्करत असते. अशा न्यायी, नि:स्पृह आणि लढाऊ पत्रकारितेच्यासाठी समाजाने आणि जनतेने उभे राहिले पाहिजे, परंतु आजचा मीडिया किंवा केतकरांची पत्रकारिता त्या प्रकारची नाही.

२८ मेच्या अंकात कुमार केतकरांनी राजस्थानातील गुर्जरांच्या आंदोलनावर ‘व्ही. पी. सिंगांचे भूत’ या शीर्षकाचा एक अग्रलेख लिहिला होता. आरक्षणाच्या मुद्द्यावर केतकरांनी नेहमीच या देशातील आरक्षणविरोधी ब्राम्हणी सत्ताधारी लॉबीचेचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. त्यामुळेच लढाऊपणे मरायला तयार होऊन हजारोंच्या संख्येने रस्त्यावर उतरलेल्या गरीब साध्यासुध्या गर्जर जनतेबद्दलची निष्ठूर संवेदनशून्यता आणि मागासवर्गीयांबद्दलचा विखर आणि तुच्छता या अग्रलेखात ओतप्रोत भरलेली आहे. या देशातील ओबीसी आणि दलित व मुस्लिमांना मसिहा वाटणारे व्ही. पी. सिंग केतकरांना भूतासारखे दिसतात. यातून केतकरांची नाळ कोणाशी जुळली आहे, हे स्पष्टच होते. परंतु वर्तमानपत्र हातात आहे म्हणून धडधडीत खोटे लिहिणे पत्रकारितेच्या कोणत्या नैतिकतेमध्ये बसते? या अग्रलेखात केतकर लिहितात, १९३१ मध्ये झालेल्या जनगणनेच्या आधारावर मंडल आयोगाने आपला अहवाल दिला आणि व्ही. पी. सिंग यांच्या सरकारने तो तातडीने अंमलात आणला.’

मंडल आयोगाने ओबीसींची लोकसंख्या मोजण्यासाठी जे अनेक आधार घेतले त्यात १९३१ च्या जनगणनेचाही आधार घेतला हे खरे. परंतु फक्त त्या जनगणनेवरून अहवाल लिहिला असे जे केतकर सुचवित आहेत, ते जाणूनबुजून लिहिलेले तद्दन खोटे आहे आणि अहवाल आल्याबरोबर तातडीने व्ही. पी. सिंगांनी अंमलात आणला हे तर धडधडीत खोटे. मंडल अहवाल सादर झाला ८० साली. व्ही. पी. सिंगांनी त्याची अंशत: अंमलबजावणी केली ९० साली. मधील १० वर्षे इंदिरा गांधी व राजीव गांधींनी तो अहवाल दाबून ठेवला. ४९ साली भारतीय संविधानाने निर्देश दिलेल्या उपाययोजनांची ९० सालापर्यंत अंमलबजावणी होत नाही या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर केतकरांचा हेतुत: दिशाभूल करण्याचा प्रयत्न ब्राम्हणवाद्यांच्या विधीनिषेधशून्य, क्रूर डावपेचांची साक्ष पटविणारा आहे. आरक्षणवाद्यांनी या देशाच्या राजकारणाचा विचका केला, असा केतकरांचा आरोप आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिराव फुले यांनी दिलेल्या आरक्षणनीतीचा विचका या ब्राम्हणी कपटनीतीने केला आहे, हे सत्य आहे.

या ठिकाणी महत्वाचा मुद्दा हा आहे की, हत्यारे आणि लाठ्याकाठ्यांनी केलेले हल्ले याला आपण लोकशाहीविरोधी गुंडगिरी म्हणतो, पण प्रत्यक्ष शस्त्रांपेक्षाही विध्वंसक पद्धतीने जेव्हा लेखणीचा बेछूट वापर सत्य दडपण्यासाठी केला जातो. वर्णीय अहंकाराने ओतप्रोत भरलेल्या उद्दाम व उर्मट भाषेत बहुजनांच्या चळवळी, नेते, प्रेरणास्थाने यांना तुच्छ ठरविण्यासाठी बौद्धिक कुरघोडी केली जाते आणि स्वत:च्या लेखनस्वातंत्र्याचा उपयोग भारतीय जनतेतील १५ टक्के असलेल्या स्वत:च्या जातवर्णाचे हितसंबंध

सांभाळण्यासाठी आणि बहुजनांचा बुद्धीभेद करण्यासाठी केला जातो, तेव्हा या बौद्धिक दहशतवादापासून लोकशाहीला अधिक मोठा धोका आहे, आपण लक्षात ठेवले पाहिजे.

‘अवतरली शिवशाही’ या अग्रलेखात केतकरांनी छ. शिवाजी महाराजांचा स्वत:च्या राजकीय फायद्यासाठी वापर करून घेणाऱ्या राजकारण्यांचे उपरोधिक भाषेत वाभाडे काढले आहेत. महाराष्ट्राचे राज्यकर्ते (जे केतकरांना प्रात:स्मरणीय असलेल्या सोनिया गांधींच्या आशीर्वादाने सत्तेतर आहेत) ते ढोंगी, भ्रष्टाचारी, बेजबाबदार आणि अकार्यक्षम आहेत, ते स्वत:च्या उणीवा भरून काढण्यासाठी पुतळे उभारून जनतेची दिशाभूल करतात हा या अग्रलेखाचा विषय आहे. वर वर पाहता बिनचूक असा तर्क त्यांनी मांडला आहे. परंतु एवढ्या मोठ्या अग्रलेखात छ. शिवाजी महाराजांबद्दल एकही गौरोद्गार नाही. छ. शिवाजी महाराजांना राज्यभिषेक करण्यास नकार देणारे ब्राम्हण, प्रत्यक्ष राजालाच नामधारी करून राज्य बळकाविणारे चित्त्पावन पेशवे व महाराष्ट्राच्या इतिहासातून त्यांना हद्दपार करणारे ब्राम्हण इतिहासकार यांचे केतकर प्रतिनिधी आहेत. कुळवाडीभूषण शिवरायांना विस्मृतीच्या पडद्याआडून प्रकाशात आणण्याचे व महाराष्ट्राला त्यांची नव्याने ओळख करून देण्याचे श्रेय महात्मा जोतिराव फुले यांच्यामुळेच आज छ. शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास जिवंत राहिला आहे. ब्राम्हणशाही विरुद्धच्या संघर्षात शिवाजी महाराजांचा हा इतिहास आणि त्याचा अन्वयार्थ बहुजन चळवळीला मार्गदर्शक आहे. त्यामुळे छ. शिवाजी महाराजांचे पुतळे हे बहुजनांच्या सांस्कृतिक अस्मितेचे प्रतिक आहेत. परंतु केतकरांच्या अग्रलेखाचे अंत:सूत्र हे आहे की, पुतळे हे निरर्थक आणि भ्रामक राजकारणाचा भाग आहेत आणि हे पुन्हा पुन्हा ठसविण्याचा बौद्धिक खटाटोप केतकरांनी अग्रलेखात केला आहे. स्वत:चे श्रेष्ठतव सिद्ध करण्यासाठी अशाप्रकारे बौद्धिकश्रेष्ठतेची प्रौढी मिरविण्याचे व बहुजनांच्या सांस्कृतिक साधनांना निर्बुद्ध व तर्कशून्य व तुच्छ ठरवून बहुजनांना न्यूनगंड देण्याचे काम ब्राम्हण नेहमी करीत आले आहेत. त्याचा प्रतिवाद करता आला नाही की, बहुजनांचा स्वाभिमान डिवचला जातो व प्रक्षोभ निर्माण होतो व प्रतिक्रिया दिली जाते.

महाराष्ट्राच्या बहुजन चळवळीची ही शोकांतिका आहे की, ब्राम्हणशाहीविरुद्धच्या संघर्षात स्वत:ला अभिमानाने शूद्र म्हणवून घेणाऱ्या महात्मा फुले यांची परंपरा पुढे नेण्याऐवजी शिवसंग्राम संघटनेसारख्या अनेक संघटनांनी आणि महाराष्ट्राच्या मराठा राज्यकर्त्यांनी उच्चनीचतेची ब्राम्हणी मूल्य रचना स्वीकारली व स्वत:ला ओबीसी, दलित, मुस्लिमांपेक्षाही श्रेष्ठ मानून क्षत्रिय सिद्ध करण्याची भूमिका घेतली व आरक्षणाला विरोध करीत ब्राम्हणांशी संगनमताचे राजकारण केले. ब्राम्हणशाहीचा पराभव करायचा असेल तर केतकरांसारख्यांवर हिंसक हल्ले करून ते साध्य होणार नाही. फुले आंबेडकरांचा वारसा स्वीकारून मूल्यात्मक आणि वैचारिक संघर्ष करण्यासाठी दलित, ओबीसी, मुस्लिमांसोबत बंधुत्वाची व समतेची चळवळ उभी करावी लागेल. शिवसंग्राम संघटना व इतर तत्सम संघटनांच्या कार्यकर्त्यांनी याचा निर्णय करावा लागेल. ●